# “ लोकशाही मूल्ये आणि मानवतावादी नेतृत्व ”

१४ एप्रील २०१७ अर्थात बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १२६ वी जयंती संपूर्ण देशभरात धुमधाममध्ये (हो, या दिवशीसुद्धा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून ८-९ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली असली तरी...)आणि खासकरून आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नागपूर येथील दीक्षाभूमीवर माथा टेकवून तद्नंतर **‘भीम ॲप’** सारख्या अनेक योजनांचा शुभारंभ करून साजरी झाली. आता थेट ६ डिसेम्बरलाच बाबासाहेबांच्या विचारांचा जागर होणार, कृती वगैरे तर काय सांगूच नका! असा सगळा आनंदी आनंद डॉ. बाबासाहेबांच्या नावाने संपूर्ण देशभर हल्ली चालू आहे. नाही म्हणायला आजकाल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा जप सरकारी पातळीवर सातत्याने ऐकायला मिळतो तो भाग अलाहिदा. मात्र निव्वळ लोकशाही मूल्ये केंद्रीभूत ठेवून त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालणाऱ्या खंद्या समर्थकांची या घडीला देशभरात वानवाच आहे. बाकी उठता बसता त्यांचं नाव फक्त घेवून फसवेगिरी करणारे नाक्या-नाक्यावर गल्लीपासून दिल्लीपर्यंत आहेत हे हि खरेच. १५ ऑगस्ट असो, २६ जानेवारी असो किंवा १४ एप्रील असो हे दिवस काय नाच-गाणे करून साजरे करायचे दिवस आहेत काय ? ३६५ दिवस तुमच्या रक्तामधून-नसानसांमधून वाहावेत असे खरे तर हे विषय आहेत.

भारतासारख्या विकसनशील देशात जनतेचे जीवनमान समाधानकारक पातळीवर आणण्याच्या मार्गावर अनेक अडथळे आहेत. ते दूर करण्याची पहिली जबाबदारी अर्थातच लोकनियुक्त केंद्र व राज्य सरकारांची आहे. त्यासाठीचे लोक-कल्याणकारी राज्य अस्तित्वात आणण्याचे सर्व आवश्यक व सखोल मार्गदर्शन आपल्या राज्यघटनेतच आहे. परंतु त्यासाठी लोकशाही मूल्याबद्दल नितांत आदर आणि त्याविषयी कटिबद्ध असणारे नेतृत्व सरकारमध्ये आणि सरकार बाहेरही असणे गरजेचे आहे. कारण लोकशाही मूल्यांना दुय्यम स्थान देऊन राजकीय व इतर ईच्छा-आकांक्षांना प्राथमिकता दिली गेली तर देशाचा विकास होईलही परंतु तो तळागाळापर्यंत जाऊन लोक-कल्याणकारी राज्याची निर्मिती होणार नाही. या शिवाय लोकशाही मूल्यांसोबत मानवतावादी दृष्टिकोणही तितकाच महत्वाचा आहे, किंबहुना तो लोकशाही मूल्यांमध्येच अंगभूत आहे-असावा.

भारताला विकसित देश म्हणून नावारूपाला येण्यासाठी जे अडथळे आहेत त्यात गरिबी आणि आर्थिक विषमता, अत्यल्प-अपुरे दरडोई उत्पन्न, त्याही खालची पातळी म्हणजे बेरोजगारी, परंपरागत शिक्षण पद्धती आणि कालसुसंगत शिक्षण व्यवस्था या मधील प्रचंड दरी, न्याय प्रक्रियेतील भयानक दिरंगाई, महिलांवरील अत्याचार, भ्रष्टाचार, जाती-व्यवस्थेचे वास्तव व त्याचे भीषण परिणाम आणि कृषी-उद्योग क्षेत्रातील प्रलंबित समस्या हे प्रामुख्याने आहेत. यातील शेतकऱ्यांच्या आणि त्यासोबत कृषिविषयक अर्थव्यवस्थेच्या महाराष्ट्रासहित संपूर्ण देशात अनेक समस्या आहेत. महाराष्ट्रातील **‘शेतकऱ्यांच्या आत्महत्या’** हे याच समस्यांचं अत्यंत गंभीर आणि विदारक दृष्य चित्र आहे. आजच्या घडीला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना अक्षरशः कोणी वाली राहिलेला नाही आणि म्हणून आता दर दिवशी वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळ्या पद्धतीने शेतकऱ्यांच्या आत्महत्या होताना दिसत आहेत. विशेष म्हणजे **‘रोज मरे त्याला कोण रडे’** या प्रमाणे समाजातील कोणताही घटक-अगदी **‘नाम फाऊंडेशन’**, **‘पाणी फाऊंडेशन’** असेल, शेतकरी संघटना असतील, समाजातील एरवी संवेदनशील असणाऱ्या व्यक्ति असतील, इतर क्षेत्रातील नेते असतील कोणी-कोणी

या समस्येकडे पुरेशा संवेदनशीलतेने व जबाबदारीने बघत नाहीये. सरकार सातत्याने या ना त्या बहाण्याने वेळकाढूपणा करत ठोस उपाय करण्याचे जाणीवपूर्वक टाळण्याचाच प्रयत्न करीत आहे. प्रसारमाध्यमांनी व न्यायालयांनीच काय तो हा प्रश्न लावून धरलाय, तो ही त्यांच्या कामाचा भाग म्हणून...

आजही महाराष्ट्रातील तमाम शेतकरी वर्ग मायबाप सरकारकडे मदतीसाठी आशा लावून बसला आहे. मात्र सरकारे सध्या **'निवडणूक जिंकण्यासाठीच सर्व काही'** या मूडमध्ये असल्याने कर्जमाफी किंवा कोणताही तातडीचा दिलासा देण्याचा प्रयत्न करताना दिसत नाहीयेत. केंद्रातील आणि इतर राज्यांतील भाजप सरकारांना २०१९ च्या निवडणुकांचे वेध लागले असून शेकडो-हजारो शेतकरी मेले तरी हरकत नाही पण निवडणुका जवळ आल्याशिवाय काही द्यायचे नाही असा ठाम निर्णयच जणू त्यांनी घेऊन टाकलाय. त्यातल्या त्यात अपवाद म्हणून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मात्र निवडणूक जाहीरनाम्यातील कर्जमाफीचं आश्वासन पूर्ण केले आहे. सत्तेत आल्या आल्या जे अडीच महिन्याच्या आत योगी आदित्यनाथ यांनी केलं ते आमच्या अडीच वर्षे सत्तेत असलेल्या आमच्या सरकारला मात्र अजून शक्य होत नाहीये याला **'राजकीय ईच्छाशक्तीचा अभाव आणि राजकीय हेतूने प्रेरित सत्ताकारण'** हिच प्रमुख कारणे आहेत हे तर काय आता जगजाहीरच आहे. महाराष्ट्रातील विरोधी पक्षातील खासकरून काँग्रेस-राष्ट्रवादी पक्ष आपापला जनाधार पुन्हा मिळवण्यासाठी म्हणूनच या प्रश्नावर काम करीत आहेत हे ही सगळेच जाणतात. त्यांना खरोखर शेतकऱ्यांचा कळवळा असता तर अर्थसंकल्पीय अधिवेशानानंतरही एकाही दिवसाचा खंड न पाडता त्यांनी कर्जमाफी मागणीसाठीचा लढा चालूच ठेवला असता, मध्ये ब्रेक घेवून मग पुन्हा संघर्ष यात्रेचे नियोजन केले नसते. अशा परिस्थितीत **'महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या'** हे अत्यंत अवघड जागेचं दुखणं दूर करावं तरी कोणी ? लोकशाही पद्धतीत विविध घटकांचे प्रश्न मांडण्यासाठी आपापल्या संघटना असतात, तशा त्या शेतकऱ्यांच्याही आहेत. विशेष म्हणजे यातीलच काही संघटना-त्यातले नेते सरकार मध्येही आहेत, असे असताना हि नेते मंडळी कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असं काहीही न करता सरकारची भलावण करून शेतकऱ्यांची चक्क दिशाभूल करण्याचंच काम करीत आहेत. हिच मंडळी आज सरकारात नसती तर त्यांचा सरकारवर दबाव तरी राहिला असता. शेतकरी संघटनांचे पदाधिकारी असणारे मंत्री जेव्हा कर्जमाफी आणि कर्ज मुक्ती यावर शब्दच्छल करून कर्जमाफी कशी अयोग्य आहे असे सांगतात किंवा त्यावर मुग गिळून विषय भलत्याच दिशेला नेतात तेव्हा शेतकऱ्यांचं मरण तर ठरलेलंच आहे. एकीकडे निगरगट्ट आणि निष्ठुर सरकार, दुसरीकडे शेतकऱ्यांच्या तिरडीवर आपली पोळी भाजून घेण्यातच धन्यता मानणारे विरोधी पक्ष, तर एसी कार्यसंस्कृतीत गाढ झोपी गेलेलं प्रशासन, डोळे बंद करून बसलेल्या शेतकरी संघटना आणि त्यांचे नेते-ज्यांना दिवसाकाठी होणाऱ्या शेतकरी आत्महत्याही दिसत नाहीत, शहरी वर्ग नोकरी-व्यवसायात पगार-धन-संपत्ती कमावून सुखासीन आयुष्यात मगन आहे, दलित-शोषित-पिडीत वर्ग नेतृत्वहिन-आपापल्या समस्यांमध्ये गुरफटलेला आणि वर कडी म्हणजे **'व्हाटस् अप ग्रस्त' सामान्य माणूस**......सर्व जण असे आपापल्या दुनियेत कसे मस्त-मश्गुल-मग्न असल्यावर बळीराजाला विचारतो कोण? **बळीराजा मेला काय आणि जगला काय कोणाला काय फरक पडतोय?**

**<u>आजच्या घडीला अस्तित्वात असलेली कोणतीही व्यवस्था शेतकऱ्यांच्या समस्यांची साधी दखलसुद्धा घेत नाही हे त्यांच्या आत्महत्यांचं प्रमुख कारण आहे ! या उलट हि व्यवस्थाच त्याला जगणं नकोसं करून आत्महत्या करायला भाग पाडते हि या प्रश्नाची दुसरी बाजू आहे ! अशा परिस्थितीत शेतकरी आत्महत्या थांबणार तरी कशा</u> ?**

वास्तविक पाहता दुष्काळामुळे शेतकरी अडचणीत सापडून त्याने आत्महत्या केल्या असत्या तर दुष्काळ काही कोणाच्या हातात नाही म्हणून सरकारकडे मर्यादित जबाबदारी राहिली असती आणि करण्यासारखे हातातसुद्धा मर्यादित उपाय-योजना असत्या. परंतु आताच्या समस्या या मानव निर्मित अर्थात सरकारच्या नाकर्तेपणामुळे, चुकीच्या आयात-निर्यात व इतर धोरणांमुळे तसेच भरीस भर नोटाबंदीसारख्या अति धाडसी निर्णयांमुळे आणि सत्तापिपासू राजकारणातून निर्माण झाल्या आहेत. अनेक चांगल्या गोष्टी घडून सुद्धा शेतकऱ्यांच्या गळ्याशी फासच आला याची अनेक उदाहरणे आहेत. यंदा पाऊस चांगला झाला, तूर, सोयाबीन, कांदा व इतरही पीके चांगली झाली परंतु या पिकांना हमीभावच नाही. बारदान नाही अशा फुटकळ कारणांवरून तूर उत्पादक शेतकऱ्यांची ससेहोलपट केली जाते. यामुळेच मग शेतकऱ्यांनी कोणी शेतातली उभी तूर जाळली तर कुणी शेतातला कांदा जाळला. मोठ्या नवसाने आलेल्या पावसानंतर रात्रंदिवस काबाड-कष्ट करून पिकवलेलं उभं पीक जाळावं लागणं हि किती क्लेशदायक बाब आहे ते इतरांना समजणे केवळ अशक्यच आहे. नोटा बंदीनंतर शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. यात मध्यंतरी रिझर्व बँकेने शेतकऱ्यांना आणि इतर कर्जदारांना कर्जफेडीसाठी काही सवलती दिल्या होत्या परंतु त्याविषयीची माहिती लोकांपर्यंत न पोहोचल्याने कर्जाचे हप्ते फेडण्यासाठीचे बँकांचे तगादे तसेच चालू होते. रिझर्व बँकेने शेतकऱ्यांना आणि इतर कर्जदारांना कर्जफेडीसाठी दिलेल्या सवलती बँकांमार्फत त्यांना शेवटी मिळाल्याच नाहीत. या शिवाय कर्ज वसुलीसाठीचे नियम बँका पाळतात किंवा मनमानी पद्धतीने वसुली करतात यावर कोणाचेही नियंत्रण नाही. उलट एकदा का माणूस कर्जदार झाला की जणू त्याची पिळवणूक करण्याचे अधिकारच सगळ्यांना मिळतात. शेतकरी किंवा कोणीही कर्जदार झाल्यावर कारणं काहीही असोत परंतु मित्र-नातेवाईक आप्तेष्ट आणि समाजातील इतरही घटकांचा बघण्याचा दृष्टीकोन बदलून जातो, याचा त्या कर्जदार व्यक्तीच्या मानसिकतेवर विपरीत व नकारात्मक परिणाम होतो. त्या विळख्यातून व्यक्ति लवकर बाहेर पडली तर पुन्हा प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकते. परंतु शेतकऱ्यांच्या बाबतीत असे घडले नाही. सलग काही वर्षे दुष्काळामुळे कर्जाचे शुक्लकाष्ठ मागे लागून ते मानसिकरीत्या पूर्णपणे खचून गेले आहेत, यामूळेच शेतकरी एकदाचा गळ्यात फास टाकून यातून मुक्त होतोय. यापेक्षा वेगळा मार्ग जर कोणी दाखवला तर शेतकरीच काय कोणीही व्यक्ति आत्महत्या करणार नाही. पण **आजच्या बळीराजाला घडीला हा मार्ग दाखवणार कोण ? हा खरा प्रश्न आहे आणि या प्रश्नाचं उत्तरही तेच आहे....**भले-भले मी-मी म्हणवणारे आज या प्रश्नावर चुप्पी साधून आहेत. दिवसेंदिवस शेतकऱ्यांचा आक्रोश वाढत चालला आहे.

खास करून भाजपच्या पाठीशी असलेले संघटनात्मक बळ बघता आणि त्या तुलनेत क्षीण होत चाललेले इतर पक्ष बघता केंद्रातील व राज्यांमधील **भाजप सरकारांनी खालच्या पातळीवरील राजकारण करण्यापेक्षा सत्तेच्या पलीकडे जाऊन वरच्या पातळीवरचे राजकारण केले आणि शेतकरी व इतर जनतेचे प्रश्न पोटतिडिकेने व प्रामाणिकपणे सोडवले तर जनता अशीही त्यांच्या पाठीशी आहेच.** पण केवळ सत्तेच्या लालसेने लोकांच्या जीवाशी खेळ केला तर मात्र भविष्यात हाती धुपाटणे आल्याशिवाय राहणार नाही. कारण मदतीसाठी मंत्रालयात आलेल्या शेतकऱ्यालाच झालेली मारहाण यासारखी प्रकरणे आणि मरणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याचं पाप दिवसागणिक सरकारच्या खात्यात जमा होत आहे. मूळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात यासाठीची कर्जमाफी आणि त्यासाठी सांगण्यात येणारा जवळपास तीस-पस्तीस हजार कोटींचा खर्च हा संबंधच चुकीचा असून त्यावरून सर्वांचीच दिशाभूल केली जात आहे. शेतकऱ्यांच्या या प्रश्नावरील इतर तातडीच्या उपाय-योजना करणे सरकारला सहज शक्य आहे, परंतु त्यावरही सरकार ढिम्म आहे. खरं तर

सरकारची तशी प्रामाणिक ईच्छा असेल तर शेतकऱ्यांच्या या प्रचंड मोठ्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी एक लोक चळवळ उभी राहून विरोधी पक्षांसहित अनेक जण सरकारच्या मदतीला येऊ शकतात. लोकशाही आणि मानवतावादी प्रामाणिक नेतृत्वाचा मुद्दा इथे उपस्थित होतो. आजच्या समाजातून गेल्या अनेक वर्षात अशाप्रकारचे नेतृत्व उदयास आलेले नाहीये. याचे कारणच मुळात आजचा समाज स्वार्थी, संकुचित, दुटप्पी आणि ढोंगी या गुण-विशेषांनी आकंठ बुडालेला आहे. **'शिवाजी जन्मावा परंतु तो बाजूच्या घरात'** हि मानसिकता हेही आजच्या या समाजाचे एक प्रमुख व्यवच्छेदक लक्षण आहे. याशिवाय **'उपयुक्ततावाद'** सगळीकडे बघायला मिळतो. म्हणजे अमुक एक काम करण्यात माझा काय फायदा आहे यालाच सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. अशा वेळी शेतकऱ्यांसाठी काय आणि समोर घडत असणाऱ्या महिलांवरील अत्याचारांबाबत, बाल-लैंगिक शोषणाविषयी किंवा इतरही अनिष्ट घटनांविषयी काय सर्वदूर उदासिनताच बघायला मिळते. सुटी देऊनसुद्धा मतदानाला न जाणाऱ्या लोकांच्या मनात ना लोकशाही मूल्ये आहेत ना माणुसकीची भावना. तर हे असे आहे आमचे '**जय महा(न)राष्ट्र**' !

परंतु **'उम्मीद से ही दुनिया कायम है'** किंवा **'बदल हा निसर्गाचा नियम आहे'** असे म्हटले जाते. मानवी जीवनाच्या इतिहासात समाज पातळीवर अनेकदा अशी मरगळ आलेली बघायला मिळते. मूळात माणूस हे एक अजबच रसायन निसर्गाने निर्माण केलंय जे स्वतःच समस्याही निर्माण करतं आणि त्यावर उपायही शोधून काढतं.

दर दिवशी शेतकरी आत्महत्यांच्या अनेक बातम्या ऐकायला-बघायला मिळण्याच्या या नाजूक काळात नुकत्याच येऊन गेलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२६व्या जयंतीच्या निमित्ताने का होईना लोकशाहीवादी विचारांचा वसा घेऊन लोककल्याणाच्या काही समस्यांची उत्तरे आपण मिळवू शकलो तर तिच या महामानवाला दिलेली खरी कृतीशील आदरांजली असेल ! त्यासाठी गल्ली पासून दिल्लीपर्यंत लोकशाही मुल्ये जपणारी व प्रामाणिक-निःस्वार्थी-मानवतावादी नेतृत्वाची व कार्यकर्त्यांची फळी मात्र निर्माण करावी लागेल...

( या संदर्भातील पथदर्शी प्रत्यक्ष कृती-कार्यक्रम

**Maharashtra Management And Development Innitiative-MMADI**

**'माडी'** म्हणजे आई ! आणि आई म्हणजे जननी-जन्मभूमी !

**'शेतकरी-बळीराजा'** या उपक्रमाद्वारे १४ एप्रिल २०१७ पासून सुरु केला असून समाजातील विविध संस्थांचे, संवेदनशील व्यक्तिंचे सक्रिय सहकार्य व सहभाग या कामी अपेक्षित आहे. )

**संपर्क:-**

**महेंद्र बैसाणे मो. ९३२१५५०२८६ ई मेल: info@bharukaka.com वेबसाईट: www.bharukaka.com**

**Maharashtra Management And Development Innitiative-MMADI**

**'माडी'** म्हणजे आई ! आणि आई म्हणजे जननी-जन्मभूमी !

'शेतकरी-बळीराजा' उपक्रमाची सुरुवात-१४ एप्रिल २०१७

**नापिकीने व कर्जाच्या बोझ्याने वैफल्यग्रस्त-निराश झालेल्या शेतकरी बांधवांसाठी**

**२४ X ७ भारुकाका हेल्प लाईन क्र. ९३२१५५०२८६**